रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 2
Part XII Section 2
भाग बारा अनुभाग 2

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 2 ] | नई दिल्ली, जून 12-18, 2025/ज्येष्ठ 22-28 (शक) 1947 | [खंड 22 |
| No. 2 ] | NEW DELHI, JUNE 12-18, 2025/JYESHTHA 22-28 (SAKA) 1947 | [Vol. 22 |
| अं. २ ] | नवी दिल्ली, जून १२-१८, २०२५/ज्येष्ठ २२-२८ (शके) १९४७ | [खंड २२ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

**विधि और न्याय मंत्रालय**

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि पेट्रोलियम ॲन्ड मिनरल्स् पाइपलाईन्स् (ॲक्विझिशन् ऑफ राइटस् ऑफ यूझर इन लॅन्ड) ॲक्ट, 1962 ; (2) दि डिझास्टर मॅनिजमेन्ट ॲक्ट, 2005 ; (3) दि नॅशनल इन्स्टिट्युटस् ऑफ टेक्नॉलॉजी, सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च ॲक्ट, 2007 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Petroleum and Minerals Pipelines (Acquisition of Right of User in Land) Act, 1962 ; (2) The Disaster Management Act, 2005 ; (3) The National Institutes of Technology, Science Education and Research Act, 2007 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि पेट्रोलियम ॲन्ड मिनरल्स् पाइपलाईन्स् (ॲक्विझिशन् ऑफ राइटस् ऑफ यूझर इन लॅन्ड) ॲक्ट, १९६२ ; (२) दि डिझास्टर मॅनिजमेन्ट ॲक्ट, २००५ ; (३) दि नॅशनल इन्स्टिट्युटस् ऑफ टेक्नॉलॉजी, सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च ॲक्ट, २००७ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची

## INDEX


| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | पेट्रोलियम व खनिज वाहिन्या (जमिनीतील वापर हक्काचे संपादन) अधिनियम, १९६२<br>The Petroleum and Minerals Pipelines (Acquisition of Right of User in Land) Act, 1962. | ५ |
| २ | आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.<br>The Disaster Management Act, 2005. | १५ |
| ३ | राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था अधिनियम, २००७.<br>The National Institutes of Technology, Science Education and Research Act, 2007. | ४५ |

# [१][राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था] अधिनियम, २००७

## (२००७ चा अधिनियम क्रमांक २९)

[२४/५/२०२४ रोजी यथाविद्यमान]

[५ मे, २००७.]

[२][विवक्षित तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थांना] राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था म्हणून घोषित करण्याकरिता आणि अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, विज्ञान व कला या शाखांमधील शिक्षण व संशोधन यांसाठी आणि अशा शाखांमधील प्रगत अध्ययन व ज्ञान प्रसार यांसाठी आणि अशा संस्थांशी संबंधित असलेल्या इतर विवक्षित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी संसदेद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमास, [१][राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था] अधिनियम, २००७, असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास [३] अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

**२.** ज्याअर्थी, [४][अनुसूची एक, अनुसूची दोन व अनुसूची तीन] यांमध्ये नमूद केलेल्या संस्थांची उद्दिष्टे त्यांना राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था बनविणे ही आहेत ; त्याअर्थी, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, अशी प्रत्येक संस्था ही राष्ट्रीय महत्त्वाची संस्था आहे. **विवक्षित संस्थांना राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था म्हणून घोषित करणे.**

**३.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) कोणत्याही संस्थेच्या संबंधात " मंडळ " याचा अर्थ, त्या संस्थेचे नियामक मंडळ, असा आहे ;

(ख) " अध्यक्ष " याचा अर्थ, मंडळाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ग) [४][अनुसूची एक, अनुसूची दोन व अनुसूची तीन] यांच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या सोसायटीच्या संबंधात " तत्सम संस्था " याचा अर्थ, [४][अनुसूची एक, अनुसूची दोन व अनुसूची तीन] यांच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली संस्था, असा आहे ;

(घ) " परिषद " याचा अर्थ, कलम ३० च्या पोट-कलम (१) [५][[६]* * * [७]* * *] अन्वये स्थापन केलेली परिषद, असा आहे ;

(ङ) कोणत्याही संस्थेच्या संबंधात, " उप संचालक " याचा अर्थ, त्या संस्थेचा उप संचालक, असा आहे;

(च) कोणत्याही संस्थेच्या संबंधात, " संचालक " याचा अर्थ, त्या संस्थेचा संचालक, असा आहे ;

(छ) " संस्था " याचा अर्थ, [४][अनुसूची एक, अनुसूची दोन व अनुसूची तीन] यांच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केलेल्या संस्थांपैकी कोणतीही संस्था, असा आहे ;

(ज) " अधिसूचना " याचा अर्थ, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे ;

(झ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ञ) कोणत्याही संस्थेच्या संबंधात, " कुलसचिव " याचा अर्थ, त्या संस्थेचा कुलसचिव, असा आहे ;

---

१. २०१२ चा अधिनियम २८ याच्या कलम ३ द्वारे, " राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था " या मजकुराऐवजी दाखल केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे, " विवक्षित तंत्रज्ञान संस्था " या मजकुराऐवजी दाखल केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

३. अधिसूचना, क्रमांक एस.ओ. १३८४(इ), ९ ऑगस्ट, २००७ द्वारे, १५ ऑगस्ट, २००७, पहा- **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग दोन, अनुभाग ३ (दोन).

४. २०१४ चा अधिनियम ९ याच्या कलम २ द्वारे, '' अनुसूची एक व अनुसूची दोन " या मजकुराऐवजी दाखल केला (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

५. २०१२ चा अधिनियम २८ याच्या कलम ५ द्वारे समाविष्ट केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

६. २०१४ चा अधिनियम ९ याच्या कलम ३ द्वारे, अनुक्रमे " किंवा " व " कलम ३०क च्या पोट-कलम (१)" हा मजकूर वगळला (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

७. २०१८ चा अधिनियम २ याच्या कलम ३ व दुसरी अनुसूची यांद्वारे " यथास्थिति " हा मजकूर वगळला (५ जानेवारी, २०१८ रोजी व तेव्हापासून).

(ट) " अनुसूची " याचा अर्थ, [1][पहिली अनुसूची, दुसरी अनुसूची व तिसरी अनुसूची], असा आहे ;

(ठ) कोणत्याही संस्थेच्या संबंधात " अधिसभा " याचा अर्थ, त्या संस्थेची अधिसभा, असा आहे ;

(ड) " सोसायटी " याचा अर्थ, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेली आणि [1][पहिल्या अनुसूचीच्या, दुसऱ्या अनुसूचीच्या व तिसऱ्या अनुसूचीच्या] स्तंभ (२) मध्ये नमूद केलेली कोणतीही सोसायटी, असा आहे ; १८६० चा २१.

(ढ) कोणत्याही संस्थेच्या संबंधात " परिनियम " व " आदेश " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले त्या संस्थेचे परिनियम व आदेश, असा आहे.

प्रकरण दोन

**संस्था**

**संस्थांचे विधिसंस्थापन.** **४.** (१) [2][पहिल्या अनुसूचीच्या, दुसऱ्या अनुसूचीच्या व तिसऱ्या अनुसूचीच्या] स्तंभ (३) मध्ये नमूद केलेली प्रत्येक संस्था ही, शाश्वत उत्तराधिकार व सामाईक मुद्रा असलेला एक निगम निकाय असेल आणि तिला, तिच्या नावाने दावा दाखल करता येईल, व तिच्याविरुद्ध दावा दाखल केला जाईल.

[3][(१क) बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याचे या अधिनियमान्वये विधिसंस्थापन करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल, आणि असे विधिसंस्थापन झाल्यावर त्या विद्यापीठास, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर असे संबोधण्यात येईल.]

(२) उक्त प्रत्येक संस्था मिळून घटित होणाऱ्या निगम निकायामध्ये, संस्थेच्या त्या त्या वेळच्या मंडळाचा अध्यक्ष, संचालक व इतर सदस्य यांचा समावेश असेल.

**संस्थांच्या विधिसंस्थापनाचा परिणाम.** **५.** या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून,

(क) या अधिनियमाव्यतिरिक्त, कोणत्याही कायद्यातील, किंवा कोणत्याही संविदेतील किंवा इतर संलेखातील संस्थेचा कोणताही निर्देश हा, तत्सम संस्थेचा निर्देश असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) एखाद्या सोसायटीची किंवा तिच्या मालकीची जंगम व स्थावर अशी सर्व मालमत्ता, तत्सम संस्थेकडे निहित होईल ;

(ग) सोसायटीचे सर्व हक्क व दायित्वे ही, तत्सम संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येतील आणि ती तत्सम संस्थेचे हक्क व दायित्वे असतील ; आणि

(घ) अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी, एखाद्या सोसायटीने नियुक्त केलेली प्रत्येक व्यक्ती ही, जर हा अधिनियम संमत झाला नसता तर, तिने जितक्या पदावधीसाठी, ज्या पारिश्रमिकावर, ज्या अटीं व शर्तीवर, आणि ज्या हक्कांसह विशेषाधिकारांसह पद धारण केले असते तितक्याच पदावधीसाठी, तेवढ्याच पारिश्रमिकावर आणि त्याच अटी व शर्तीवर आणि निवृत्तिवेतन, रजा उपदान, भविष्यनिर्वाह निधी व इतर बाबी यांसंबंधातील तशाच हक्कांसह व विशेष अधिकारांसह तत्सम संस्थेमध्ये आपले पद धारण करील किंवा सेवा करील आणि तिची नोकरी समाप्त झाल्याखेरीज व समाप्त होईपर्यंत किंवा असा पदावधी, पारिश्रमिक आणि अटी व शर्ती यांमध्ये परिनियमांद्वारे यथोचित फेरफार करण्यात येईपर्यंत ती आपले पद धारण करणे चालू ठेवील :

परंतु, जर अशा प्रकारे केलेला फेरफार अशा कर्मचाऱ्यांस स्वीकार्य नसेल तर, त्या कर्मचाऱ्याबरोबर केलेल्या कराराच्या अटींनुसार किंवा, याबाबतीत त्यामध्ये कोणतीही तरतूद केलेली नसेल तर, स्थायी कर्मचाऱ्याच्या बाबतीत तीन महिन्यांच्या पारिश्रमिका इतकी व इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एका महिन्याच्या पारिश्रमिका इतकी भरपाई संस्थेकडून त्याला दिल्यावर, संस्थेला त्याची नोकरी समाप्त करता येईल.

---

१. २०१४ चा अधिनियम ९ याच्या कलम ३ द्वारे, " पहिल्या अनुसूचीच्या व दुसऱ्या अनुसूचीच्या " या मजकुराऐवजी दाखल केला (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे, " पहिल्या अनुसूचीच्या व दुसऱ्या अनुसूचीच्या " या मजकुराऐवजी दाखल केला (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे खंड (१क) समाविष्ट केला (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

२०१४ चा ९. [1][**५क.** राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून,— **बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याच्या विधिसंस्थापनाचा परिणाम.**

(क) कोणत्याही कायद्यातील, संविदेतील किंवा इतर संलेखातील बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याचा कोणताही निर्देश हा, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर याचा निर्देश असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याची किंवा त्याच्या मालकीची जंगम व स्थावर अशी सर्व मालमत्ता, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर याकडे निहित होईल ;

(ग) बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याचे सर्व हक्क व दायित्वे ही, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर यांचे हक्क व दायित्वे असतील ;

२०१४ चा ९. (घ) राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी, बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर यामध्ये नोकरी करीत असलेली प्रत्येक व्यक्ती (संचालक, अधिकारी व इतर कर्मचारी यांसह), अशा प्रारंभाच्या दिनांकास व त्यानंतर, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर याची कर्मचारी होईल आणि जणू काही उक्त अधिनियम अंमलात आला नव्हता असे समजून राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन (सुधारणा) अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभाच्या दिनांकास, तिने जितक्या पदावधीसाठी, ज्या पारिश्रमिकावर, ज्या अटी व शर्तींवर आणि ज्या हक्कांसह व विशेषाधिकारांसह पद धारण केले असते, तितक्याच पदावधीसाठी, तेवढ्याच पारिश्रमिकावर आणि त्याच अटी व शर्तींवर आणि निवृत्तिवेतन, रजा, उपदान, भविष्यनिर्वाह निधी व इतर बाबी यांसंबंधातील तशाच हक्कांसह व विशेषाधिकारांसह आपले पद धारण करील किंवा सेवा करील आणि तिची नोकरी समाप्त होईपर्यंत किंवा असा पदावधी, पारिश्रमिक, अटी व शर्ती यांमध्ये परिनियमांद्वारे किंवा आदेशाद्वारे फेरफार करण्यात येईपर्यंत ती आपले पद धारण करणे चालू ठेवील :

परंतु, अशा व्यक्तीचा पदावधी, पारिश्रमिक, अटी व सेवा शर्ती यांमध्ये, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेशिवाय, तिला अहितकारी ठरेल असा फेरफार केला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, उक्त अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या कोणत्याही कायद्यातील, संलेखातील किंवा इतर दस्तऐवजातील बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याचे कुलपती व कुलगुरू यांच्या कोणत्याही निर्देशाचा, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर यांचे अनुक्रमे कुलाध्यक्ष व संचालक यांचा निर्देश असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(ङ) केंद्र सरकार, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर यासाठी नवीन संचालक नियुक्त करील अशा दिनांकापर्यंत, बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याचा कुलगुरू हा, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर याचा संचालक असेल.

२०१४ चा ९. (च) राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन (सुधारणा) अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी प्रवेशासाठी किंवा पदवीदानासाठी बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर यांनी आयोजित केलेली कोणतीही परीक्षा ही, वैध परीक्षा असेल आणि ती, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर यांद्वारे आयोजित करण्यात आलेली असल्याचे मानण्यात येईल.]

**६.** (१) या अधिनियमांच्या तरतुदींस अधीन राहून, प्रत्येक संस्था, पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :— **संस्थांचे अधिकार.**

(क) संस्थेला योग्य वाटेल त्याप्रमाणे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, विज्ञान व कला अशा ज्ञान शाखांमधील शिक्षण व संशोधन यांसाठी, आणि अशा ज्ञान शाखांमधील प्रगत अध्ययन व ज्ञान प्रसार यांसाठी तरतूद करणे ;

(ख) परीक्षा घेणे, आणि पदव्या, पदविका व इतर विद्याविषयक मानविशेष किंवा किताब देणे ;

(ग) मानद पदव्या किंवा इतर मानविशेष प्रदान करणे ;

(घ) शुल्क व इतर आकार निश्चित करणे, त्याची मागणी करणे व ते स्वीकारणे ;

(ङ) विद्यार्थ्यांच्या निवासासाठी निवासगृहे व वसतिगृहे स्थापन करणे, त्यांचे परिरक्षण व व्यवस्था पाहणे ;

---

१. २०१४ चा अधिनियम ९ याच्या कलम ५ द्वारे कलम ५क समाविष्ट केले (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

(च) निवासस्थानाचे पर्यवेक्षण व नियंत्रण करणे आणि संस्थेमधील विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे विनियमन करणे आणि त्यांचे आरोग्य, सार्वत्रिक कल्याण आणि सांस्कृतिक व समूह जीवन यांस चालना देण्याची व्यवस्था करणे ;

(छ) संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय छात्रसेनेची युनिटे सुरू ठेवण्याकरिता तरतूद करणे ;

(ज) केंद्र सरकारच्या पूर्व मान्यतेने विद्याविषयक व इतर पदांची निर्मिती करणे आणि संचालक [१][***] वगळून त्यांच्या नेमणूका करणे ;

(झ) परिनियम व आदेश तयार करणे व त्यांमध्ये फेरफार करणे, फेरबदल करणे किंवा ते रद्द करणे ;

(ञ) संस्थेची उद्दिष्टे उन्नत करण्यासाठी, संस्थेला योग्य वाटेल अशा रीतीने संस्थेची मालकी असणाऱ्या किंवा संस्थेकडे निहित असलेल्या कोणत्याही मालमत्तेसंबंधात कार्यवाही करणे ;

(ट) सरकारकडून दाने, अनुदाने, देणग्या किंवा लाभदाने स्वीकारणे आणि मृत्युपत्रकर्ता, दाते, किंवा, यथास्थिति, हस्तांतरक यांच्याकडून जंगम किंवा स्थावर मालमत्तांची मृत्युपत्रित दाने, दान व हस्तांतरणे स्वीकारणे ;

(ठ) संस्थेच्या उद्दिष्टांशी संपूर्णतः किंवा अंशतः समान उद्दिष्टे असणाऱ्या जगाच्या कोणत्याही भागातील शैक्षणिक किंवा इतर संस्थांबरोबर, शिक्षक व विद्याव्यासंगी यांचे आदान प्रदान करून आणि साधारणपणे त्यांच्या सामाईक उद्दिष्टांना हितावह ठरेल अशा रीतीने सहकार्य करणे ;

(ड) अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, विद्यार्थी सहायता अनुदाने, पारितोषिके व पदके सुरू करणे व ती प्रदान करणे ;

(ढ) संस्थेशी संबंधित असणाऱ्या क्षेत्रांमधील किंवा ज्ञानशाखांमधील सल्ला देण्याची जबाबदारी स्वीकारणे ; आणि

(ण) संस्थेची सर्व किंवा कोणतीही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक, आनुषंगिक किंवा हितावह ठरतील अशा सर्व गोष्टी करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, संस्था, केंद्र सरकारच्या पूर्व मान्यतेशिवाय कोणत्याही स्थावर मालमत्तेची कोणत्याही रीतीने विल्हेवाट लावणार नाही.

**सर्व वंश, पंथ व वर्ग यांच्यासाठी संस्था खुल्या असणे.**

**७.** (१) प्रत्येक संस्था, स्त्री-पुरुषांसाठी आणि कोणत्याही प्रकारचे वंश, जात, पंथ किंवा वर्ग यांमधील व्यक्तींसाठी खुली असेल, आणि सदस्य, विद्यार्थी, शिक्षक किंवा कामगार यांना प्रवेश देतेवेळी किंवा त्याची नियुक्ती करतेवेळी किंवा जे जे काही असेल अशा इतर कोणत्याही संबंधात, धार्मिक समजुती किंवा धर्मश्रद्धा यांसंबंधीची कोणतीही चाचणी किंवा अट लादण्यात येणार नाही.

(२) परिषदेच्या मते, ज्यामध्ये या कलमाच्या तत्त्वाच्या व उद्दिष्टांच्या विरुद्ध असलेल्या शर्ती किंवा आबंधने अंतर्भूत आहेत असे कोणत्याही मालमत्तेची कोणतीही मृत्युपत्रित दाने, दान किंवा हस्तांतरण कोणत्याही संस्थेकडून स्वीकारले जाणार नाही.

**संस्थांमधील शिक्षण.**

**८.** प्रत्येक संस्थेमधील सर्व शिक्षण, याबाबतीत केलेल्या परिनियमांनुसार व आदेशानुसार संस्थेकडून किंवा संस्थेच्या नावाने करण्यात येईल.

**कुलाध्यक्ष.**

**९.** (१) भारताचा राष्ट्रपती, प्रत्येक संस्थेचा कुलाध्यक्ष असेल.

(२) कुलाध्यक्षास, कोणत्याही संस्थेच्या कामाचा व प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आणि कुलाध्यक्ष निदेश देईल अशा रीतीने तिच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी व त्यावर अहवाल देण्यासाठी एका किंवा अधिक व्यक्तींची नियुक्ती करता येईल.

(३) असा कोणताही अहवाल मिळाल्यावर कुलाध्यक्षास, अहवालाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई करता येईल आणि असे निदेश देता येतील आणि संस्था, अशा निदेशांचे, वाजवी वेळेत पालन करण्यासाठी बांधील असेल.

---

१. २०१२ चा अधिनियम, २८ याच्या कलम ७ द्वारे, " व उप संचालक " हा मजकूर वगळला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

**१०.** संस्थेची प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील :— **संस्थांची प्राधिकरणे.**

(क) नियामक मंडळ ;

(ख) अधिसभा ; आणि

(ग) संस्थेची प्राधिकरणे असल्याची परिनियमांद्वारे घोषित करण्यात येतील अशी इतर प्राधिकरणे.

**११.** [१][पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक संस्थेचे] मंडळ, पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :— **नियामक मंडळ.**

(क) कुलाध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचा अध्यक्ष ;

(ख) संचालक, पदसिद्ध सदस्य ;

(ग) केंद्र सरकारने, तंत्रशिक्षण व वित्त यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींमधून नामनिर्देशित करावयाच्या, भारत सरकारच्या सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या दोन व्यक्ती ;

(घ) [१][पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली संस्था] ज्या राज्यात स्थित आहे त्या राज्याच्या शासनाच्या मते, ज्या व्यक्ती प्रतिष्ठित तंत्रशास्त्रज्ञ किंवा उद्योगपती आहेत अशा व्यक्तींमधून त्या शासनाने नामनिर्देशित करावयाच्या दोन व्यक्ती ;

(ङ) परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या, शिक्षण अभियांत्रिकी किंवा विज्ञान यांसंबंधातील विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या दोन व्यक्ती, त्यांपैकी किमान एक महिला असेल ; [२][***]

(च) अधिसभेने नामनिर्देशित करावयाचे [३][पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या संस्थेचा] एक प्राध्यापक व एक सहायक प्राध्यापक किंवा व्याख्याता ;

[४][(छ) ज्याच्या परिक्षेत्रात संस्था स्थित आहे त्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेचा संचालक, किंवा प्राध्यापकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती].

[५][**११क.** [७][दुसऱ्या अनुसूचीमध्ये व तिसऱ्या अनुसूचीमध्ये] नमूद केलेल्या प्रत्येक संस्थेचे मंडळ, पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :— **[६][दुसऱ्या अनुसूचीमधील व तिसऱ्या अनुसूचीमधील] संस्थेची मंडळे.**

(क) कुलाध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचा अध्यक्ष ;

(ख) भारत सरकारच्या उच्च शिक्षण विभागाचा सचिव, किंवा भारत सरकारच्या सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, पदसिद्ध सदस्य ;

(ग) संस्थेचा संचालक, पदसिद्ध सदस्य ;

(घ) भारतीय विज्ञान संस्था, बेंगलोर याचा संचालक, पदसिद्ध सदस्य ;

(ङ) केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाचा, भारतीय तंत्रज्ञान संस्थांपैकी एका संस्थेचा संचालक ;

(च) केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाचे, आपल्या विज्ञान किंवा उद्योग मंत्रालयांचे प्रतिनिधित्व करणारे भारत सरकारचे दोन सचिव ;

(छ) ज्या राज्यात संस्था स्थित आहे त्या राज्याचा मुख्य सचिव, किंवा भारत सरकारच्या सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती, पदसिद्ध सदस्य ;

(ज) अधिसभेने नामनिर्देशित करावयाचे संस्थेचे दोन प्राध्यापक ;

(झ) परिषदेने नामनिर्देशित करावयाचे, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी किंवा विज्ञान यासंबंधातील विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असलेले दोन विख्यात शास्त्रज्ञ, त्यापैकी एक महिला असेल ; आणि

(ञ) वित्तीय सल्लागार, मनुष्यबळ विकास मंत्रालय, पदसिद्ध सदस्य.] ;

---

१. २०१२ चा अधिनियम २८ याच्या कलम ८ द्वारे, "संस्था" या शब्दाच्या व्याकरणिक फेरफारांसह त्याऐवजी हा मजकूर दाखल केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे, "आणि" हा शब्द वगळला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे, "संस्थेचा" याऐवजी हा मजकूर दाखल केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे खंड (छ) समाविष्ट केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे कलम ११ क समाविष्ट केले (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

६. २०१४ चा अधिनियम ९ याच्या कलम ६ द्वारे, "दुसऱ्या अनुसूचीमधील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे "दुसऱ्या अनुसूचीमध्ये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

**मंडळाच्या सदस्यांचा पदावधी, त्यांच्यामधून रिक्त होणाऱ्या जागा व त्यांना प्रदेय असलेले भत्ते.**

**१२.** या कलमामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज :—

(क) मंडळाच्या अध्यक्षाचा किंवा इतर सदस्यांचा पदावधी, त्यांच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षे इतका असेल ;

(ख) पदसिद्ध सदस्याचा पदावधी, तो ज्या पदाच्या आधारे सदस्य असेल ते पद तो धारण करीपर्यंत असेल ;

(ग) कलम ११ च्या खंड (च) [१][आणि कलम ११ क च्या खंड (ज)] अन्वये नामनिर्देशित केलेल्या सदस्याचा पदावधी, त्याच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून दोन वर्षे इतका असेल ;

(घ) नैमित्तिक रिक्त जागा, कलम ११ [१][किंवा, यथास्थिति, कलम ११ क] च्या तरतुदींनुसार भरण्यात येईल ;

(ङ) नैमित्तिक रिक्त जागा, भरण्यासाठी नामनिर्देशित केलेल्या सदस्याचा पदावधी, ज्या सदस्याच्या जागी त्याला नामनिर्देशित करण्यात आले असेल त्या सदस्याच्या उर्वरित कालावधी इतकाच असेल ;

(च) मंडळाचा सदस्य, परिनियमांमध्ये भत्त्यांसाठी तरतूद केली असेल त्याप्रमाणे संस्थेकडून असे भत्ते, कोणतेही असल्यास, मिळण्यास हक्कदार असेल परंतु, कलम ११ च्या खंड (ख) व (च) [१][आणि कलम ११ क च्या खंड (ग) व (ज)] यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांव्यतिरिक्त इतर कोणताही सदस्य, या खंडामुळे कोणतेही वेतन मिळण्यास हक्कदार असणार नाही.

**मंडळाचे अधिकार व कार्ये.**

**१३.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक संस्थेचे मंडळ, संस्थेच्या कारभाराचे सर्वसाधारण अधीक्षण, निदेशन व नियंत्रण यांसाठी जबाबदार असेल आणि ते, हा अधिनियम, परिनियम व आदेश यांद्वारे ज्यांसाठी अन्यथा तरतूद केली नसेल अशा संस्थेच्या सर्व अधिकारांचा वापर करील, आणि त्याला अधिसभेच्या कार्याचा आढावा घेण्याचा अधिकार असेल.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींना बाध न येऊ देता, प्रत्येक संस्थेचे मंडळ,—

(क) संस्थेचे प्रशासन व कामकाज यांच्याशी संबंधित असणाऱ्या धोरणात्मक प्रश्नांवर निर्णय घेईल ;

(ख) संस्थेमध्ये अभ्यास पाठ्यक्रम सुरू करील ;

(ग) परिनियम तयार करील ;

(घ) संस्थेमध्ये विद्याविषयक तसेच इतर पदांची निर्मिती करील व त्यावर व्यक्तींची नेमणूक करील ;

(ङ) आदेशांबाबत विचार करील आणि त्यांत फेरबदल करील किंवा ते रद्द करील ;

(च) वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे पुढील वित्तीय वर्षाची संस्थेची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके यावर विचार करील व त्यांवरील ठराव संमत करील आणि त्यांच्या विकास योजनांच्या विवरणपत्रांसह ते परिषदेस सादर करील ;

(छ) या अधिनियमाद्वारे किंवा परिनियमांद्वारे त्याला प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील किंवा त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(३) मंडळाला, या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा समित्या नियुक्त करण्याचा अधिकार असेल.

**अधिसभा.**

**१४.** प्रत्येक संस्थेची अधिसभा, पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल :—

(क) संचालक, पदसिद्ध, जो अधिसभेचा अध्यक्ष असेल ;

(ख) उप संचालक, पदसिद्ध ;

(ग) संस्थेमध्ये शिक्षण देण्याच्या प्रयोजनासाठी, संस्थेने नियुक्त केलेले किंवा अशा प्रकारे मान्यता दिलेले प्राध्यापक ;

---

१. २०१२ चा अधिनियम, २८ याच्या कलम १० द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

(घ) विज्ञान, अभियांत्रिकी व मानवविज्ञान या क्षेत्रातील प्रतिष्ठित शिक्षणतज्ज्ञांमधून प्रत्येकी एक याप्रमाणे, अध्यक्षाने संचालकाशी विचारविनिमय करून नामनिर्देशित करावयाच्या संस्थेच्या कर्मचारी नसतील अशा तीन व्यक्ती, त्यांपैकी एक महिला असेल ; आणि

(ङ) परिनियमांमध्ये निर्धारित करण्यात येतील असे कर्मचारीवर्गाचे इतर सदस्य.

**अधिसभेची कार्ये.**

**१५.** या अधिनियमाच्या, परिनियमांच्या आणि आदेशांच्या तरतुदींस अधीन राहून, संस्थेची अधिसभा, संस्थेचे नियंत्रण व सर्वसाधारण नियमन करील, आणि ती, संस्थेतील अध्यापनाचा, शिक्षणाचा आणि परीक्षेचा दर्जा राखण्यास जबाबदार असेल, आणि ती, परिनियमांद्वारे तिला प्रदान करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील किंवा तिच्याकडे सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**मंडळाचा अध्यक्ष.**

**१६.** (१) अध्यक्ष, साधारणपणे मंडळाच्या बैठकींचे व संस्थेच्या पदवीदान समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवील.

(२) मंडळाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी केली जात आहे, याची सुनिश्चिती करणे हे अध्यक्षाचे कर्तव्य असेल.

(३) अध्यक्ष, या अधिनियमाद्वारे किंवा परिनियमांद्वारे त्याला नेमून देण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

**संचालक व उप संचालक.**

**१७.** (१) कुलाध्यक्षाकडून संस्थेच्या संचालकाची [१][* * *] परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा सेवाविषयक अटी व शर्तींवर आणि अशा रीतीने त्याने घटित केलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून नियुक्ती करण्यात येईल.

(२) संचालक हा संस्थेचा प्रधान शिक्षण व कार्यकारी अधिकारी असेल आणि संस्थेच्या योग्य प्रशासनासाठी आणि संस्थेमध्ये शिक्षण देण्यासाठी व त्यात शिस्त राखण्यासाठी जबाबदार असेल.

(३) संचालक, मंडळाला वार्षिक अहवाल व लेखे सादर करील.

(४) संचालक, अधिनियमाद्वारे किंवा परिनियमाद्वारे किंवा आदेशांद्वारे त्याला नेमून देण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

[२][(५) प्रत्येक संस्थेच्या उप संचालकाची परिनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा रीतीने व अशा अटी व शर्तींवर नियुक्ती करण्यात येईल आणि तो, या अधिनियमाद्वारे किंवा परिनियमांद्वारे किंवा संचालकाकडून त्याला नेमून देण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.]

**कुलसचिव.**

**१८.** (१) प्रत्येक संस्थेच्या कुलसचिवाची परिनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा अटीं व शर्तींवर नियुक्ती करण्यात येईल आणि तो, संस्थेचे अभिलेख सामाईक मोहोर, निधी यांचा आणि मंडळ त्याच्या ताब्यात देईल अशा, संस्थेच्या इतर मालमत्तेचा परिरक्षक असेल.

(२) कुलसचिव, मंडळाचा, अधिसभेचा व परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा समित्यांचा सचिव म्हणून कार्य करील.

(३) कुलसचिव, त्याची कार्ये योग्यपणे पार पाडण्यासाठी संचालकाला जबाबदार असेल.

(४) कुलसचिव, या अधिनियमाद्वारे किंवा परिनियमांद्वारे किंवा संचालकाकडून त्याला नेमून देण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**इतर प्राधिकारी व अधिकारी.**

**१९.** वर नमूद केलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त इतर प्राधिकारी व अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये, परिनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील.

---

१. २०१२ चा अधिनियम, २८ याच्या कलम ११ द्वारे, " व उप संचालक " हा मजकूर वगळला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे, पोट-कलम (५) ऐवजी हा मजकूर दाखल केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

केंद्र सरकारकडून अनुदाने.

**२०.** संस्थांना, या अधिनियमाखालील त्यांची कार्ये कार्यक्षमपणे पार पाडणे शक्य व्हावे या प्रयोजनासाठी, केंद्र सरकारला, या बाबतीतील कायद्याद्वारे संसदेने केलेल्या योग्य विनियोजनानंतर प्रत्येक संस्थेस, प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये त्यास योग्य वाटतील अशा पैशांच्या रकमा त्यास योग्य वाटेल अशा रीतीने देता येतील.

संस्थेचा निधी.

**२१.** (१) प्रत्येक संस्थेचा एक निधी असेल, त्यामध्ये,—

(क) केंद्र सरकारने दिलेला सर्व पैसा ;

(ख) संस्थेने स्वीकारलेले सर्व शुल्क व इतर आकार ;

(ग) अनुदाने, बक्षिसे, दान, लाभदाने, मृत्युपत्रित दान किंवा हस्तांतरण या मार्गाने संस्थेने स्वीकारलेला सर्व पैसा ; आणि

(घ) इतर कोणत्याही रीतीने किंवा इतर कोणत्याही स्त्रोताकडून संस्थेने स्वीकारलेला सर्व पैसा, जमा करण्यात येईल.

(२) प्रत्येक संस्थेच्या निधीत जमा झालेला सर्व पैसा, संस्था, केंद्र सरकारच्या मान्यतेने ठरवील अशा बँकांमध्ये, ठेव म्हणून ठेवण्यात येईल किंवा अशा रीतीने त्याची गुंतवणूक करण्यात येईल.

(३) प्रत्येक संस्थेचा निधी, या अधिनियमाखालील संस्थेच्या अधिकारांचा वापर करताना व तिची कर्तव्ये पार पाडताना केलेल्या खर्चासह तिचे खर्च भागविण्यासाठी वापरण्यात येईल.

लेखे व लेखापरीक्षा.

**२२.** (१) प्रत्येक संस्था, योग्य ते लेखे व इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याच्याशी विचारविनिमय करून, केंद्र सरकारकडून अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यातील ताळेबंदासह लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) प्रत्येक संस्थेच्या लेख्यांची, भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याच्याकडून लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात त्याने केलेला कोणताही खर्च, संस्थेकडून भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याला प्रदेय असेल.

(३) भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक यास आणि कोणत्याही संस्थेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, सरकारी लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक यास जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार अशा लेखापरीक्षेच्या संबंधात असतील, आणि विशेषकरून, पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्यासाठी मागणी करण्याचे आणि संस्थेच्या कार्यालयांची तपासणी करण्याचे अधिकार असतील.

(४) भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याने किंवा याबाबतीत त्याने नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने प्रमाणित केलेले प्रत्येक संस्थेचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह दरवर्षी केंद्र सरकारकडे पाठविण्यात येतील आणि ते सरकार, केंद्र सरकारकडून निर्धारित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते मांडण्याची व्यवस्था करील.

निवृत्तीवेतन व भविष्यनिर्वाह निधी.

**२३.** प्रत्येक संस्था, तिच्या कर्मचाऱ्यांच्या लाभासाठी, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीन राहून, तिला योग्य वाटेल असा भविष्यनिर्वाह निधी किंवा निवृत्तीवेतन निधी घटित करील किंवा अशा विमा योजनेची तरतूद करील.

नियुक्त्या.

**२४.** संचालकाखेरीज [१][* * *] प्रत्येक संस्थेतील कर्मचारीवर्गाच्या सर्व नियुक्त्या ह्या,—

(क) जर नियुक्ती, विद्याविषयक कर्मचारीवर्गातील अधिव्याख्याता किंवा त्यावरील पदावर केली जात असेल तर किंवा जर नियुक्ती, ज्या संवर्गाची कमाल वेतनश्रेणी दहा हजार पाचशे रुपयांपेक्षा अधिक असेल अशा बिगर-विद्याविषयक कर्मचारीवर्गाच्या कोणत्याही संवर्गात करावयाची असेल तर, ती मंडळाकडून ;

(ख) इतर कोणत्याही बाबतीत, संचालकाकडून,

परिनियमांमध्ये निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येतील.

---

१. २०१२ चा अधिनियम, २८ याच्या कलम १२ द्वारे, " व उप संचालक " हा मजकूर वगळला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

**२५.** या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, परिनियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :— **परिनियम.**

(क) मानद पदव्या प्रदान करणे ;

(ख) अध्यापन विभागांची निर्मिती करणे ;

(ग) संस्थेतील अभ्यास पाठ्यक्रमांसाठी आणि संस्थेच्या पदव्या व पदविका यांच्या परीक्षांसाठी प्रवेश देण्याकरिता आकारावयाचे शुल्क ;

(घ) अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, विद्यार्थी सहायता अनुदाने, पदके व पारितोषिके सुरू करणे ;

(ङ) संस्थेच्या अधिकाऱ्यांचा पदावधी व त्यांच्या नियुक्तीच्या पद्धती ;

(च) संस्थेतील शिक्षकांच्या अर्हता ;

(छ) संस्थेतील शिक्षक व इतर कर्मचारीवर्ग यांची वर्गवारी, त्यांच्या नियुक्तीच्या पद्धती व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती निश्चित करणे ;

(ज) संस्थेतील अधिकारी, शिक्षक व इतर कर्मचारीवर्ग यांच्या लाभासाठी निवृत्तीवेतन, विमा व भविष्यनिर्वाह निधी घटित करणे ;

(झ) संस्थेची घटना, तिच्या प्राधिकरणांचे अधिकार व कर्तव्ये ;

(ञ) निवासगृहे व वसतिगृहे स्थापन करणे आणि त्यांचे परिरक्षण करणे ;

(ट) संस्थेतील विद्यार्थ्यांच्या निवासाच्या शर्ती आणि निवासगृहे व वसतिगृहे यांमधील निवासाचे शुल्क व इतर आकार यांची आकारणी करणे ;

(ठ) मंडळाच्या अध्यक्षास व सदस्यांना प्रदान करावयाचे भत्ते ;

(ड) मंडळाचे आदेश व निर्णय यांचे अधिप्रमाणन ; आणि

(ढ) मंडळ, अधिसभा, किंवा कोणतीही समिती यांच्या बैठकी, अशा बैठकींची गणपूर्ती आणि त्यांचे कामकाज चालवताना अनुसरावयाची कार्यपद्धती.

**२६.** (१) प्रत्येक संस्थेचे पहिले परिनियम कुलाध्यक्षाच्या पूर्वमान्यतेने केंद्र सरकारकडून तयार करण्यात येतील आणि त्यांची एक प्रत शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल. **परिनियम कसे तयार करावेत.**

(२) मंडळास वेळोवेळी नवीन किंवा अतिरिक्त परिनियम तयार करता येतील किंवा या कलमामध्ये तरतूद केलेल्या रीतीने त्या परिनियमांमध्ये सुधारणा करता येईल किंवा ते निरसित करता येतील.

(३) प्रत्येक नवीन परिनियमास किंवा परिनियमांमध्ये भर घालण्यास किंवा परिनियमांमध्ये कोणतीही सुधारणा करण्यास किंवा ते निरसित करण्यास कुलाध्यक्षाच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता असेल, तो त्यांस अनुमती देऊ शकेल किंवा अनुमती रोखून ठेवू शकेल किंवा तो विचारार्थ मंडळाकडे पाठवू शकेल.

(४) नवीन परिनियम अथवा विद्यमान परिनियमांत सुधारणा करणारा किंवा त्यांचे निरसन करणारा परिनियम, कुलाध्यक्षाकडून त्यास अनुमती दिल्याखेरीज वैध असणार नाही.

**२७.** या अधिनियमाच्या व परिनियमांच्या तरतुदींस अधीन राहून, प्रत्येक संस्थेच्या आदेशांमध्ये, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :— **आदेश.**

(क) संस्थेमध्ये विद्यार्थांना प्रवेश देणे ;

(ख) संस्थेच्या सर्व पदव्या व पदविका यांसाठी निर्धारित करावयाचे अभ्यास पाठ्यक्रम ;

(ग) ज्या शर्तीअन्वये विद्यार्थ्यांना संस्थेच्या पदवी किंवा पदविका पाठ्यक्रमांना व परीक्षांना प्रवेश देण्यात येईल, आणि ज्याअन्वये ते पदव्या व पदविकांसाठी पात्र ठरतील त्या शर्ती ;

(घ) अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, विद्यार्थी सहायता अनुदाने, पदके व पारितोषिके प्रदान करण्याच्या शर्ती ;

(ङ) परीक्षा मंडळे, परीक्षक व नियामक यांच्या नियुक्तीच्या शर्ती व पद्धत आणि कर्तव्ये ;

(च) परीक्षा घेणे ;

(छ) संस्थेच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखणे ; आणि

(ज) या अधिनियमाद्वारे किंवा परिनियमांद्वारे जिची तरतूद करावयाची आहे अशी किंवा आदेशाद्वारे जिच्यासाठी तरतूद करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

**आदेश कसे तयार करावेत.** **२८.** (१) या कलमामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज आदेश अधिसभेकडून तयार करण्यात येतील.

(२) अधिसभेने तयार केलेले सर्व आदेश, ती निदेश देईल अशा दिनांकापासून अंमलात येतील, परंतु अशा प्रकारे तयार केलेला प्रत्येक आदेश, होईल तितक्या लवकर, मंडळास सादर करण्यात येईल आणि मंडळाकडून, त्याच्या पुढच्या बैठकीत त्यावर विचार करण्यात येईल.

(३) मंडळास, ठरावाद्वारे, अशा कोणत्याही आदेशात फेरबदल करण्याचा किंवा तो रद्द करण्याचा अधिकार असेल आणि अशा ठरावाच्या दिनांकापासून असा आदेश त्यानुसार फेरबदल केलेल्या स्वरुपात लागू असेल किंवा, यथास्थिति, तो रद्द झालेला असेल.

**लवाद न्यायाधिकरण.** **२९.** (१) संस्था व तिचे कोणतेही कर्मचारी यांच्यामधील संविदेतून उद्‌भवणारा कोणताही विवाद, संबंधित कर्मचाऱ्याच्या विनंतीवरून किंवा संस्थेच्या सांगण्यावरून, संस्थेने नियुक्त केलेला एक सदस्य, कर्मचाऱ्यांनी नामनिर्देशित केलेला एक सदस्य व कुलाध्यक्षाने नियुक्त केलेला एक पंच यांनी मिळून बनलेल्या लवाद न्यायाधिकरणाकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल.

(२) न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि त्या निर्णयास कोणत्याही न्यायालयामध्ये हरकत घेतली जाणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये जी बाब लवाद न्यायाधिकरणाकडे निर्णयार्थ पाठविणे आवश्यक असेल अशा कोणत्याही बाबीच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

(४) लवाद न्यायाधिकरणाला त्याच्या स्वतःच्या कार्यपद्धतीचे विनियमन करण्याचा अधिकार असेल.

(५) लवादासंबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील कोणतीही बाब, या कलमाखालील लवादांना लागू होणार नाही.

प्रकरण तीन

## परिषद

**परिषदेची स्थापना.** **३०.** (१) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून, [१][पहिल्या अनुसूचीच्या], [२][दुसऱ्या अनुसूचीच्या व तिसऱ्या अनुसूचीच्या] स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व संस्थांसाठी परिषद म्हणून संबोधण्यात येणारा एक केंद्रीय निकाय स्थापन करण्यात येईल.

(२) परिषद पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) तंत्र शिक्षणाचे प्रशासकीय नियंत्रण असणाऱ्या केंद्र सरकारच्या मंत्रालयाचा किंवा विभागाचा प्रभारी मंत्री, पदसिद्ध अध्यक्ष ;

(ख) तंत्र शिक्षणाचे प्रशासकीय नियंत्रण असणाऱ्या केंद्र सरकारच्या मंत्रालयाचा किंवा विभागाचा प्रभारी असलेला भारत सरकारचा सचिव, पदसिद्ध उपाध्यक्ष ;

(ग) प्रत्येक मंडळाचा अध्यक्ष, पदसिद्ध सदस्य ;

(घ) प्रत्येक संस्थेचा संचालक, पदसिद्ध सदस्य ;

(ङ) विद्यापीठ अनुदान आयोगाचा अध्यक्ष, पदसिद्ध सदस्य ;

(च) वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेचा महासंचालक, पदसिद्ध सदस्य ;

---

१. २०१२ चा अधिनियम २८ याच्या कलम १३ द्वारे, "अनुसूचीच्या" या ऐवजी हा मजकूर दाखल केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

२. २०१४ चा अधिनियम ९ याच्या कलम ७ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

(छ) जैवतंत्रज्ञान, अणुऊर्जा, माहिती तंत्रज्ञान व अवकाश यांच्याशी संबंधित असणारे केंद्र सरकारच्या मंत्रालयांचे किंवा विभागांचे प्रतिनिधीत्व करणारे भारत सरकारचे चार सचिव, पदसिद्ध सदस्य ;

(ज) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा अध्यक्ष, पदसिद्ध सदस्य ;

(झ) कुलाध्यक्षाने नामनिर्देशन करावयाच्या, शिक्षण, उद्योग, विज्ञान किंवा तंत्रज्ञान यासंबंधातील विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या, तीनपेक्षा कमी नसतील, परंतु, पाचपेक्षा अधिक नसतील इतक्या व्यक्ती, त्यांपैकी किमान एक महिला असेल ;

(ञ) संसदेचे तीन सदस्य, त्यांपैकी दोघांची लोकसभेकडून व एकाची राज्यसभेकडून निवड करण्यात येईल :

परंतु, परिषदेच्या सदस्याच्या पदामुळे, त्याचा धारक, संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडला जाण्यासाठी किंवा सदस्य बनण्यासाठी निरर्ह ठरणार नाही ;

(ट) संस्था ज्या ठिकाणी स्थित आहेत तेथील तंत्र शिक्षणाशी संबंधित असलेल्या, राज्य शासनाच्या मंत्रालयामधील किंवा विभागांमधील त्या शासनाचे दोन सचिव, पदसिद्ध सदस्य ;

(ठ) केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाशी किंवा विभागाशी संबंधित असलेला वित्तीय सल्लागार, पदसिद्ध सदस्य ;

(ड) तंत्र शिक्षणाचे प्रशासकीय नियंत्रण असणाऱ्या केंद्र सरकारच्या मंत्रालयातील किंवा विभागातील भारत सरकारच्या सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला एक अधिकारी, पदसिद्ध सदस्य-सचिव.

२०१२ चा २८.
२०१४ चा ९.

**[३०क. दुसऱ्या अनुसूचीमधील संस्थांसाठी परिषदेची स्थापना.]** राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१२ याच्या कलम ९ द्वारे समाविष्ट केले (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून) आणि राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान, शिक्षण व संशोधन (सुधारणा) अधिनियम, २०२४ याच्या कलम ८ द्वारे वगळले (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

**परिषदेच्या सदस्यांचा पदावधी, त्यांच्यामधून रिक्त होणाऱ्या जागा व त्यांना प्रदेय असलेले भत्ते.**

**३१.** (१) सदस्याचा पदावधी, अधिसूचनेच्या दिनांकापासून तीन वर्षे इतका असेल :

परंतु, पदसिद्ध सदस्याचा पदावधी, ज्या पदाच्या आधारे तो असा सदस्य असेल ते पद त्याने धारण करीपर्यंतच असेल.

(२) कलम ३० च्या पोट-कलम (२) च्या खंड (ञ) [1]* * * अन्वये निवडलेल्या सदस्याचा पदावधी हा, ज्या सभागृहावर त्याला निवडून दिलेले असेल त्या सभागृहाचा तो सदस्य असण्याचे बंद झाल्यावर लगेचच समाप्त होईल.

(३) नैमित्तिक रिक्त होणाऱ्या जागा भरण्यासाठी नामनिर्देशित केलेल्या किंवा निवडलेल्या सदस्याचा पदावधी हा, त्याची ज्या सदस्याच्या जागी नियुक्ती करण्यात आली असेल त्या सदस्याच्या उर्वरित कालावधी इतकाच असेल.

(४) या कलमामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, मावळता सदस्य हा, केंद्र सरकारने अन्यथा निदेश दिले नसतील तर, दुसऱ्या व्यक्तीची त्याच्या जागी सदस्य म्हणून नियुक्ती केली जाईपर्यंत त्या पदावर राहील.

(५) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त परिषदेच्या इतर सदस्यांना, विहित करण्यात येतील असे प्रवास व इतर भत्ते देण्यात येतील.

**परिषदेची कार्ये.**

**३२.** (१) सर्व संस्थांच्या कार्यांचे समन्वयन करणे हे परिषदेचे एक सर्वसाधारण कर्तव्य असेल.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदीस बाध न आणता, परिषद पुढील कार्ये पार पाडील :—

(क) पाठ्यक्रमांचा कालावधी, संस्थांकडून प्रदान केल्या जाणाऱ्या पदव्या व इतर विद्याविषयक मानविशेष, प्रवेशाची मानके व इतर शैक्षणिक बाबी यांसंबंधातील बाबींवर सल्ला देणे ;

(ख) कर्मचाऱ्यांचे संवर्ग, त्यांच्या भरतीच्या पद्धती व सेवेच्या शर्ती, शिष्यवृत्त्या व शुल्क माफी सुरू करणे, शुल्क आकारणी व सामूहिक हिताच्या इतर बाबी यांसंबंधात धोरण निर्धारित करणे ;

---

१. २०१४ चा अधिनियम ९ याच्या कलम ९ द्वारे, "आणि कलम ३०क च्या पोट-कलम (२) च्या खंड (ञ)" हा मजकूर वगळला (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

(ग) प्रत्येक संस्थेच्या विकासविषयक योजनांचे परीक्षण करणे आणि त्यांपैकी आवश्यक वाटतील अशा योजनांना मान्यता देणे आणि अशा मान्यता दिलेल्या योजनांचे अपेक्षित वित्तीय भारदेखील स्थूलमानाने दर्शविणे ;

(घ) या अधिनियमान्वये कुलाध्यक्षाने पार पाडावयाच्या कोणत्याही कार्याच्या बाबतीत, जर तशी आवश्यकता असेल तर, त्याला सल्ला देणे ; आणि

(ङ) या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये परिषदेला नेमून दिलेली असतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

**परिषदेचा अध्यक्ष.**

**३३.** (१) परिषदेचा अध्यक्ष, सामान्यपणे परिषदेच्या बैठकींचे अध्यक्षस्थान भूषवील :

परंतु, त्याच्या अनुपस्थितीत, परिषदेचा उपाध्यक्ष परिषदेच्या बैठकींचे अध्यक्षस्थान भूषवील.

(२) परिषदेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी केली जात आहे याची खातरजमा करणे हे परिषदेच्या अध्यक्षाचे कर्तव्य असेल.

(३) अध्यक्ष, या अधिनियमाद्वारे त्याला नेमून दिलेले असतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(४) परिषद प्रत्येक वर्षातून एकदा बैठक घेईल आणि तिच्या बैठकींमध्ये, विहीत करण्यात येईल अशा कार्यपद्धतीचे अनुसरण करील.

**या प्रकरणातील बाबींसंबंधात नियम करण्याचा अधिकार.**

**३४.** (१) केंद्र सरकारला, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषकरून, व पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ३१ च्या पोट-कलम (५) अन्वये, परिषदेच्या सदस्यांना प्रदेय असलेले प्रवास व इतर भत्ते ; आणि

(ख) कलम ३३ च्या पोट-कलम (४) अन्वये परिषदेच्या बैठकीमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती.

(३) केंद्र सरकारने या प्रकरणाखाली केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम, अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये याआधी केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

प्रकरण चार

## संकीर्ण

**रिक्त जागा, इत्यादींमुळे कृती व कार्यवाही अवैध न ठरणे.**

**३५.** या अधिनियमान्वये किंवा परिनियमान्वये स्थापन केलेल्या परिषदेची किंवा कोणत्याही संस्थेची किंवा मंडळाची किंवा अधिसभेची किंवा इतर कोणत्याही निकायाची कोणतीही कृती ही,—

(क) त्यातील कोणतीही रिक्त जागा किंवा त्याच्या घटनेतील दोष ; किंवा

(ख) त्याचा सदस्य म्हणून कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या निवडीतील, नामनिर्देशनातील किंवा नियुक्तीतील कोणताही दोष ; किंवा

(ग) प्रकरणाच्या गुणावगुणांवर परिणाम न करणारी त्याच्या कार्यपद्धतीतील कोणतीही अनियमितता,

केवळ या कारणांमुळे अवैध ठरणार नाही.

**३६.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी करता येतील : **अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

परंतु, ज्या दिनांकास या अधिनियमाला राष्ट्रपतीची संमती मिळेल त्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात येणारा प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**३७.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी,— **संक्रमणकालीन तरतुदी.**

(क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अशा प्रकारे कार्यरत असणारे, [१][पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या] प्रत्येक संस्थेचे नियामक मंडळ हे, या अधिनियमाअन्वये त्या संस्थेसाठी नवीन मंडळ घटित केले जाईपर्यंत तशाच प्रकारे नियमितपणे काम करीत राहील, परंतु या अधिनियमान्वये नवीन मंडळ घटित केल्यावर, अशा प्रकारे घटित करण्यापूर्वी पद धारण करणारा मंडळाचा सदस्य, पद धारण करण्याचे बंद करील ;

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी प्रत्येक संस्थेच्या संबंधात घटित केलेली प्रत्येक अधिसभा, त्या संस्थेसाठी या अधिनियमान्वये अधिसभा घटित केली जाईपर्यंत, या अधिनियमान्वये घटित केलेली अधिसभा असल्याचे मानण्यात येईल परंतु, या अधिनियमान्वये नवीन अधिसभा घटित केल्यावर, अशा प्रकारे घटित करण्यापूर्वी पद धारण करणारे अधिसभेचे सदस्य, पद धारण करण्याचे बंद करतील.

२०१२ चा २८. [२][(ग) राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१२ याच्या प्रारंभापूर्वी जी सुरू केली होती ती भरती प्रक्रिया व शिस्तभंगाची कार्यवाही ही, अशा अधिनियमाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या संबंधित तरतुदींनुसार, योग्य त्या फेरफारांसह, पूर्ण करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**एखाद्या पदाची भरती प्रक्रिया ही, त्या पदासाठी अर्ज मागविणारी जाहिरात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सुरू केली असल्याचे मानण्यात येईल, आणि संस्थेच्या कर्मचाऱ्याला जबर शास्तीबद्दल दोषारोपपत्र किंवा सौम्य शास्तीबद्दल कारणे दाखवा नोटीस दिल्याच्या दिनांकास अशा कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू केली असल्याचे मानण्यात येईल ;

(घ) अनुक्रमे कलमे २५ व २७ अन्वये परिनियम व आदेश यांद्वारे तरतूद करण्याचा उद्देश असलेल्या सर्व बाबींचे, असे परिनियम व आदेश केले जाईपर्यंत, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या संबंधित तरतुदींद्वारे योग्य त्या फेरफारांसह नियमन करण्यात येईल.]

२०१४ चा ९. [३][(ङ) राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कामे पार पाडणारी बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याची विधिसभा, विद्यापरिषद व कार्यकारी परिषद हे, या अधिनियमान्वये भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान, शिबपूर याकरिता मंडळ घटित केले जाईपर्यंत, नियमितपणे काम करीत राहील. परंतु, या अधिनियमान्वये मंडळ घटित केल्यावर किंवा त्यानंतर विधिसभा, विद्यापरिषद व कार्यकारी परिषद यांचे सदस्य, पद धारण करण्याचे बंद करतील ;

२०१४ चा ९. (च) राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कार्यरत असणारी बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याची प्राधिकरणे,—मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येवोत, उक्त अधिनियमान्वये ती कामे पार पाडण्यासाठी नवीन प्राधिकरण नियुक्त किंवा घटित केले जाईपर्यंत नियमितपणे काम करीत राहील, परंतु अशी नियुक्ती किंवा अशा प्रकारे घटित केल्यावर किंवा
२००४ चा १३. त्यानंतर, बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ शिबपूर अधिनियम, २००४ किंवा त्याखाली केलेले कोणतेही परिनियम किंवा आदेश यांन्वये कार्ये पार पाडणारी प्राधिकरणे, पद धारण करण्याचे बंद करतील ;

---

१. २०१२ चा अधिनियम, २८ याच्या कलम १६ द्वारे हा मजकूर सामविष्ट केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे खंड (क) व (ख) समाविष्ट केले.

३. २०१४ चा अधिनियम, ९ याच्या कलम १० द्वारे हा मजकूर सामविष्ट केला (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

(छ) राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभापूर्वी प्रत्येक अधिसभा किंवा प्रत्येक संस्थेच्या संबंधात घटित केलेली, तशा नावाने संबोधली जाणारी इतर कोणतीही प्राधिकरणे ही, त्या संस्थेकरिता या अधिनियमान्वये नवीन अधिसभा घटित केली जाईपर्यंत, उक्त अधिनियमान्वये घटित अधिसभा असल्याचे मानण्यात येईल, परंतु, या अधिनियमान्वये नवीन अधिसभा घटित केल्यावर, अशा प्रकारे घटित करण्यापूर्वी पद धारण करणारे अधिसभेचे सदस्य, पद धारण करण्याचे बंद करतील ; २०१४ चा ९.

(ज) राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन (सुधारणा) अधिनियम, २०१४ अन्वये पहिले परिनियम आणि आदेश तयार करण्यात येईपर्यंत आणि अंमलात येईपर्यंत, उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर याकरिता केलेले परिनियम, आदेश व नियम हे, जेथवर ते उक्त अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, शिबपूर यास नियमितपणे लागू राहतील.] २०१४ चा ९.

[1][पहिली अनुसूची]

[कलमे ३ (छ), (ड) व ४(१) पहा]

या अधिनियमामध्ये समाविष्ट केलेल्या केंद्रीय संस्थांची सूची

| अ. क्र. (१) | सोसायटी (२) | तत्सम संस्था (३) |
|---|---|---|
| १. | मोतीलाल नेहरू राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, अलाहाबाद सोसायटी. | मोतीलाल नेहरू राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, अलाहाबाद. |
| २. | मौलाना आझाद राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, भोपाळ सोसायटी. | मौलाना आझाद राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, भोपाळ. |
| ३. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, कालिकत सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, कालिकत. |
| ४. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, दुर्गापूर सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, दुर्गापूर. |
| ५. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, हमिरपूर सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, हमिरपूर. |
| ६. | मालवीय राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, जयपूर सोसायटी. | मालवीय राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, जयपूर. |
| ७. | डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, जालंधर सोसायटी. | डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, जालंधर. |
| ८. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, जमशेदपूर सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, जमशेदपूर. |
| ९. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, कुरुक्षेत्र सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, कुरूक्षेत्र. |
| १०. | विश्वैश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर सोसायटी. | विश्वैश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर. |
| ११. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, पाटणा सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, पाटणा. |
| १२. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, राऊरकेला सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, राऊरकेला. |
| १३. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, सिलचर सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, सिलचर. |
| १४. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, श्रीनगर सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, श्रीनगर. |
| १५. | सरदार वल्लभभाई राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, सुरत सोसायटी. | सरदार वल्लभभाई राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, सुरत. |
| १६. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, कर्नाटक, सुरथ्कल सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, कर्नाटक, सुरथ्कल. |
| १७. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, तिरुचिरापल्ली सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, तिरूचिरापल्ली. |
| १८. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, वारंगळ सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, वारंगळ. |
| १९. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, रायपूर सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, रायपूर. |
| २०. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, आगरतळा सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, आगरतळा. |

१. २०१२ चा अधिनियम, २८ याच्या कलम १९ द्वारे विद्यमान अनुसूचीस "पहिली अनुसूची" असा क्रमांक दिला आहे (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| [1][२१. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, गोवा सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, गोवा. |
| २२. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, पुदुचेरी सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, पुदुचेरी. |
| २३. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, दिल्ली सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, दिल्ली. |
| २४. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, सुमारी (श्रीनगर), उत्तराखंड सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, उत्तराखंड. |
| २५. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, सोहरा (मेघालय) सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, मेघालय. |
| २६. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, मिझोरम सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, मिझोरम. |
| २७. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, मणिपूर सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, मणिपूर. |
| २८. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागालँड सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागालँड. |
| २९. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, अरुणाचल प्रदेश सोसायटी. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, अरुणाचल प्रदेश. |
| ३०. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, सिक्कीम. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, सिक्कीम.] |
| [2][३१. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, आंध्र प्रदेश. | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, आंध्र प्रदेश.] |

१. २०१२ चा अधिनियम, २८ याच्या कलम १९ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

२. २०१६ चा अधिनियम, ४२ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (२० ऑगस्ट, २०१५ रोजी व तेव्हापासून).

[1][दुसरी अनुसूची

[कलमे ३ (छ), (ड) आणि ४(१) व ११क पहा]

**भारतीय विज्ञान शिक्षण संशोधन संस्थांची सूची**

| अ. क्र. | सोसायटी | तत्सम संस्था |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, कोलकाता सोसायटी. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, कोलकाता. |
| २. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, पुणे सोसायटी. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, पुणे. |
| ३. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, मोहाली सोसायटी. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, मोहाली. |
| ४. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, भोपाळ सोसायटी. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, भोपाळ. |
| ५. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, तिरुअनंतपूरम सोसायटी. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, तिरुअनंतपूरम.] |
| [2][६. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, तिरुपती सोसायटी. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, तिरुपती. |
| ७. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, बेऱ्हामपूर सोसायटी. | भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, बेऱ्हामपूर.] |

---

१. २०१२ चा अधिनियम, २८ याच्या कलम १९ द्वारे दुसरी अनुसूची समाविष्ट केली (७ जून, २०१२ रोजी व तेव्हापासून).

२. २०१७ चा अधिनियम, १९ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (३० सप्टेंबर, २०१७ रोजी व तेव्हापासून.).

[१][तिसरी अनुसूची

[कलमे ३ (छ), (ट), (ड), ४(१) व ११क पहा]

**भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्थांची सूची**

| अ. क्र. | विद्यापीठ किंवा सोसायटी | तत्सम संस्था |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | बंगाल अभियांत्रिकी व विज्ञान विद्यापीठ, शिबपूर. | भारतीय अभियांत्रिकी विज्ञान व तंत्रज्ञान संस्था शिबपूर.] |

**डॉ. राजीव मणि,**
सचिव,
भारत सरकार.

१. २०१४ चा अधिनियम ९ याच्या कलम १२ द्वारे तिसरी अनुसूची समाविष्ट केली (४ मार्च, २०१४ रोजी व तेव्हापासून).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.